श्री गणेश सुरवसे यांना दि. ०४/०४/२०२२ रोजी चार वर्षे पुर्ण होत आहेत. त्यांनी या चार वर्षामध्ये विविध नाविन्यपर्ण उपक्रम हाती घेवुन ते यशस्वीरित्या पुर्ण केले आहेत, महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये कमी सेवकांमध्ये उत्तम प्रशासकीय कामकाज केले आहे तसेच महाविद्यालयाच्या अंतर्गत उत्पन्न वाढीसाठी विषेश प्रयत्न केले आहेत.

श्री. गणेश सुरवसे यांनी मागील संस्थेमध्ये दिली जाणारी वेतनश्रेणी १५६००-३९१००+६०००AGP ही लागू करून रक्कम रु.३२,४०० बेसिक प्रमाणे वेतन देणेबाबत विनंती केलेली आहे.

Basic	AGP	DA	HRA	VA	Total
32400	6000	41088	3840	1200	84528

मागील संस्थेमध्ये दिली जाणारी वेतनश्रेणी संरक्षित होवून त्यानुसार वार्षिक वेतनवाढ व पगार मिळणेबाबत या कार्यालयाकडे विनंती अर्ज केला आहे.

त्यांनी मागील संस्थेमध्ये दिली जाणारी वेतनश्रेणी संरक्षित झाली नाही त्यामुळे आर्थिक नुकसान होत असलेने दिनांक २०/०४/२०२२ पासून प्रबंधक या पदाचा राजीनामा देत असलेबाबत दि. २० जानेवारी २०२२ रोजी नोटीस दिली आहे.

श्री. गणेश सुरवसे यांची सेवा या महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी गरजेची आहे त्यामुळे त्यांना खास बाब म्हणून मागील संस्थेमध्ये दिली जाणारी वेतनश्रेणी १५६००-३९१००+६०००AGP हि लागू करून रक्कम रु. ३२,४०० बेसिक प्रमाणे वेतन देणेबाबत सभेने मंजुरी दिली.

सूचक -: प्रि. डॉ. ए. सी. अत्तार
अनुमोदक -: मा. डॉ. एन. बी. पासलकर
ठराव सर्वानुमते मंजूर.....

विषय क्र.११. :- महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवकांच्या १२ वर्ष कालबध्द पदोन्नती बाबत चर्चा करून निर्णय घेणे.

ठराव क्र. ११ :- शिक्षकेत्तर सेवकांना नियमानुसार १२ वर्षानंतर कालबध्द पदोन्नती देणेबाबात तरतुद आहे. या महाविद्यालयातील बहुतांश सेवकांना सदर पदोन्नती देण्यात आली आहे. मागील बरेच वर्ष सदरची प्रक्रिया राबवली नसलेने खालील सेवकांना सदरची पदोन्नतीचा लाभ देण्यात आलेला नाही. खालील सेवकांनी १२ वर्षानंतर कालबध्द पदोन्नती मिळणेबाबत या कार्यालयाकडे व संस्थेकडे प्रस्ताव सादर केले आहेत, त्याची माहिती पुढील प्रमाणे-

अ. क्र.	सेवकांचे नाव	पद	१२ वर्ष कालबध्द पदोन्नतीसाठी पात्र दिनांक	वेतनावर होणारी मासिक वाढ
१	श्री. राजेंद्र आनंदराव पाटील	तांत्रिक सहाय्यक	१५.१२.२०१८	४१००
२	श्री. चंद्रकांत विष्णु हत्ते	कनिष्ठ लिपीक	३०.०६.२००८	१७५०
३	श्रीमती. विद्या सुर्यकांत निकम	कनिष्ठ लिपीक	१६.०७.२०१४	१३५०

४	श्री. दत्तात्रय मारूतराव भोईटे	कनिष्ठ लिपीक	१५.१२.२०१८	६००
५	श्री. पोपट भगवान भोसले	डे-वॉचमन	३१.०७.२०१०	९००
६	श्री. संजय बाजीराव काकडे	शिपाई	३०.०६.२००८	९५०
७	श्री. विजय गणपत दौंडे	शिपाई	३०.०९.२००८	९५०
८	श्री. राजाराम साहेबराव गायकवाड	शिपाई	१५.१२.२०१८	४००
९	श्री. वसंतराव मोहनराव गुजर	शिपाई	३०.०४.२००४	११००
१०	श्री. दिनकर महादेव झगडे	शिपाई	०१.०७.२०१९	३५०

याबाबत रयत शिक्षण संस्थेचे पत्र क्र. १६६३५ दिनांक २९.०३.२०२२ व त्यामध्ये नमुद केलेले शासन निर्णय सभेच्या अवलोकनार्थ सोबत जोडले आहेत. महाविद्यालयातील इतर सेव शिक्षकेत्तर सेवकांना १२ वर्षानंतर कालबद्ध पदोन्नतीचा लाभ देण्यात आला असलेने उपरोक्त सेवकांना सदरचा लाभ देणेबाबत विचार व्हावा, असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी व्यक्त केले त्यानुसार सभेमध्ये चर्चा झाली. याबाबत या सभेचे सन्माननीय सदस्य डॉ. एच ए. मांडवे व डॉ. सुनिता व्ही माने यांची समिती गठीत करावी व सदर समितीच्या शिफारशीनुसार नियमानुसार उपरोक्त सेवकांना १२ वर्षानंतर कालबद्ध पदोन्नतीचा लाभ देण्यात यावा असे ठरले.

सूचक -: डॉ. एस. व्ही. माने
अनुमोदक -: प्रि. डॉ. विठ्ठल शिवणकर
ठराव सर्वानुमते मंजूर.....

विषय क्र.१२. :- महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवक श्री. चंद्रकांत व्ही. हत्ते यांचे अर्जित रजारोखीकरण प्रस्तावावर चर्चा करून निर्णय घेणे.

ठराव क्र. १२ :- या महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवक श्री. चंद्रकांत व्ही. हत्ते - कनिष्ठ लिपीक कम रेकॉर्ड किपर हे महाविद्यालयामधुन दि.३०/१०/२०२१ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. श्री. चंद्रकांत व्ही. हत्ते

यांच्या सेवानिवृत्तीच्या वेळी त्यांचे रजाखातेवर २९७ रजा शिल्लक आहेत. नियमानुसार नॉन व्हेकेशनल कर्मचाऱ्यांना शिल्लक असलेल्या अर्जित रजेचे रजारोखीकरण दिले जाते. श्री. चंद्रकांत व्ही. हत्ते यांनी सदर रजांचे रजा रोखीकरण मिळणेसंदर्भात संस्था कार्यालयास अर्ज सादर केला आहे. त्यास अनुसरून मा. सहसचिव (उशि) यांचे पत्र क्र. उ.शि./१५१८१ दिनांक ०२/०२/२०२२ नुसार सदर विषय नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) समोर ठेवुन जो निर्णय होईल त्याची माहिती संस्था कार्यालयास कळवणे संदर्भात सुचित केले आहे. श्री. चंद्रकांत व्ही. हत्ते यांचे रजा रोखीकरणाची रक्कम रू.२,९२,०३० इतकी आहे, याबाबत सभेने मार्गदर्शन केले. श्री. चंद्रकांत व्ही. हत्ते यांचे एकुण सेवाकाळातील कामकाज समाधानकारक असलेने श्री. चंद्रकांत व्ही. हत्ते यांना नियमानुसार रजारोखीकरण देण्यास सभेने मंजुरी दिली.

सूचक -: डॉ. एस. व्ही. माने
अनुमोदक -: प्रि. डॉ. विठ्ठल शिवणकर
ठराव सर्वानुमते मंजूर.....

विषय क्र.१३. :- महाविद्यालयातील हंगामी / रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या सेवकांचे मानधनाबाबात धोरण ठरविणेसाठी गठीत केलेल्या समितीच्या अहवालावर चर्चा करून निर्णय घेणे.

ठराव क्र. १३:- या महाविद्यालयामध्ये शिक्षक सेवकांची एकुण ५९ पदे मंजुर आहेत यापैकी ३४ पुर्णवेळ कायम शिक्षक सेवक नियुक्त आहेत. तसेच ८९ शिक्षकेत्तर सेवकांची पदे आवश्यक आहेत यापैकी ३२ पुर्णवेळ कायम शिक्षकेत्तर सेवक कार्यरत आहेत. रिक्त असणारी शिक्षक सेवकांची पदे हंगामी तत्वावर व शिक्षकेत्तर सेवकांची पदे रोजंदरी तत्वावर

आवश्यकतेनुसार दरवर्षी भरत आहोत. सदर हंगामी किंवा रोजंदारी सेवकांना द्यावयाच्या मानधनाबाबात व वार्षीक वाढीबाबत धोरण ठरविणेसाठी महाविद्यालय स्तरावर समिती गठित केली होती. सदर समितीच्या अहवालानुसार मासिक मानधन व वार्षिक वाढ याबाबत शिफारस महाविद्यालयचे प्राचार्य यांनी सभेसमोर ठेवले.

Sr. No.	Designation	Pay Scale - 6th Pay	1 Year	2 Year	3 Year	4 Year	5 Year	6 Year	7 Year	8 Year	9 Year	10 Year
			Basic+AGP +10%HRA	Basic+AGP +10%HRA+ 10% DA	Basic+AGP +10%HRA+ 20% DA	Basic+AGP +10%HRA+ 30% DA	Basic+AGP +10%HRA+ 40% DA	Basic+AGP +10%HRA+ 50% DA	Basic+AGP +10%HRA+ 50% DA	Basic+AGP +10%HRA+ 70% DA	Basic+AGP +10%HRA+ 80% DA	Basic+AGP +10%HRA+
1	Assistant Professor	15600 - 39100 +6000 AGP	23760	25920	28080	30240	32400	34560	36720	38880	41040	43200
2	Progranner	9300-34800 +5400 AGP	16170	17640	19110	20580	22050	23520	24990	26460	27930	29400
3	Stenographer / Superintendent	9300-34800 +4400 AGP	15070	16440	17810	19180	20550	21920	23290	24660	26030	27400
4	Computer Operator	5200-20200 +2800 AGP	8800	9600	10400	11200	12000	12800	13600	14400	15200	16000
5	Technicians / Technical Assistant	5200-20200 +2800 AGP	8800	9600	10400	11200	12000	12800	13600	14400	15200	16000
6	Lab Assistant	5200-20200 +2000 AGP	7920	8640	9360	10080	10800	11520	12240	12960	13680	1440
7	Workshop Instructor	5200-20200 +2400 AGP	8360	9120	9880	10640	11400	12160	12920	13680	14440	1520
8	Sr. Clerk	5200-20200 +2400 AGP	8360	9120	9880	10640	11400	12160	12920	13680	14440	1520
9	Jr. Clerk	5200-20200 +1900 AGP	7810	8520	9230	9940	10650	11360	12070	12780	13490	14200

10	Peon/Sweeper/Gardner	4440-7440+1300 AGP	6314	6888	7462	8036	8610	9184	9758	10332	10906	11480

उपरोक्तप्रमाणे समितीच्या अहवालानुसार केलेली मासिक मानधन व वार्षिक वाढ याबाबतची शिफारस याची सभेने नोंद घेतली. तसेच उपरोक्त शिक्षकेत्तर सेवकांना हंगामी तत्वावर नियुक्ती आदेश देणेबाबात सभेने मार्गदर्शन केले.

उपरोक्तप्रमाणे समितीच्या अहवालानुसार हंगामी / रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या सेवकांचे मानधनाबाबात केलेली मासिक मानधन व वार्षिक वाढ याबाबतची शिफारशीस सभेने मंजुरी दिली.

सूचक -: मा. श्री. धैर्यशील भोसले
अनुमोदक -: मा. डॉ. अनिल पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर.....

विषय क्र.१४. :- महाविद्यालय Professional पध्दतीने चालवणेसाठी स्वतंत्र नियमावली तयार करणेबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

ठराव क्र. १४:- कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, सातारा हे महाविद्यालय सन १९८३ साली विनाअनुदानित तत्वावर सुरू झाले आहे. रयत शिक्षण संस्थेचे हे एकमेव अभियांत्रिकी महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाबरोबर सुरू झालेली इतर सर्व महाविद्यालये आज प्रगतीच्या शिखरावर पोहचली आहेत. तथापी या महाविद्यालयामध्ये पुर्ण क्षमतेने प्रवेश होत नसल्याचे दिसुन येते.

रयत शिक्षण संस्थेच्या ध्येयधोरणानुसार हे महाविद्यालय शासकीय नियमानुसार चालवले जाते. अनेकदा शासनाचे सर्व नियम विनाअनुदानित महाविद्यालयांना लागु करणे सोईचे होत नाही. शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांना कामकाजाच्या अनुषंगाने कर्त्यव्ये व जबाबदरी यांचे जाणीव असने गरजेचे

आहे. कर्त्यव्यात कसुर करणाऱ्या सेवकांना त्याची जाणीव करून देणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी स्वतंत्र नियमावली असणे गरजेचे वाटते.

महाविद्यालय Professional पध्दतीने चालवणेसाठी सभेने मार्गदर्शन केले. महाविद्यालय Professional पध्दतीने चालवणेसाठी सर्व प्रकारचे निर्णय घेणेचे अधिकार नियामक मंडळला (गर्व्हनिंग बॉडी) देणेत आले आहेत.

सूचक -: मा. दिलीप वळसे पाटील
अनुमोदक -: प्रिं.डॉ. विठ्ठल शिवणकर
ठराव सर्वानुमते मंजूर.....

विषय क्र.१५. :- महाविद्यालयामधील सेवकांनी दिलेल्या निवेदनाबाबात चर्चा करणे.

ठराव क्र. १५ :- या महाविद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांनी विविध मागण्यासाठी निवेदने या कार्यालयास सादर केली आहेत, याची माहिती सभेसमोर ठेवण्यात आली

अ. महागाई भत्ता सुधारीत दराने लागू करणेबाबत. -

या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांचा जानेवारी २०१५ पासुन महागाई भत्ता १०७ टक्के इतका अदा केला जातो. सध्या शासकीस नियमानुसार सहाव्या वेतन अयोगामध्ये १९६ टक्के महागाई भत्ता देणेबाबत राज्य शासनाने आदेश पारित केले आहेत. रयत शिक्षण संस्थेने पत्र क्र. ल.म./१८/४८८१ दिनांक ०८/०२/१९९० नुसार राज्य शासनाने लागु केलेले महागाई भत्ता व इतर

लाभ देण्यात यावे असे कळविले आहे. त्यानुसार महाविद्यालयाच्या आर्थिक स्थितीचा विचार करता सुधारीत दराने महागाई भत्ता लागु करता येईल किंवा कसे याबाबतची माहिती खालीलप्रमाणे -

(Figures in Lacs)

OPTION NO.	DA RATE	INCREASE % YEARLY	MONTHLY GROSS PAY	MONTHLY ADDITION	YEARLY ADDITION	YEARLY SALARY
1	107%	CURRENT	59.03	-	-	708.41
2	119%	8.45%	64.01	4.98	59.82	768.23
3	132%	13.41%	66.95	7.91	95.02	803.43
4	142%	17.24%	69.20	10.17	122.10	830.51
5	164%	25.65%	74.17	15.14	181.68	890.09
6	189%	35.20%	79.81	20.78	249.37	957.78

उपरोक्त प्रमाणे सभेमध्ये चर्चा झाली त्यानुसार महाविद्यालयाच्या आर्थिक स्थितिचा विचार करता दिनांक ०१/०४/२०२२ पासून महागाई भत्ता ११९ टक्के दराने लागू करणेस सभेने मंजुरी दिली.

ब. सातवा वेतन आयोग लागु करणे.-

महाविद्यालयीन सेवकांना दि. ०१/०१/२०१६ पासुन सातवा वेतन आयोग लागु करणेबाबात अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी अधिसुचित केले आहे. त्यानुसार या महाविद्यालयातील सेवकांनी सातवा वेतन आयोग लागु होणेबाबत या कार्यालयास विनंती अर्ज केला आहे. यावर सभेमध्ये चर्चा झाली व सदरचा विषय तूर्तास स्थगित ठेवणेत यावा असे ठरले.

क. सातवा वेतन आयोग फरक मिळणेबाबत -

महाविद्यालयीन सेवकांना दि. ०१/०१/२०१६ पासुन सातवा वेतन आयोग लागु करणेबाबात अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी अधिसुचित केले आहे. त्यानुसार या महाविद्यालयातील सेवकांनी सातवा वेतन आयोग लागु

होणेबाबत व त्यानुसारचा फरक मिळणेबाबत या कार्यालयास विनंती अर्ज केला आहे. यावर सभेमध्ये चर्चा झाली व सदरचा विषय तूर्तास स्थगित ठेवणेत यावा असे ठरले.

ड. शिक्षक सेवकांचे CAS अंतर्गत AGP बदल मिळणेबाबत -

महाविद्यालयीन शिक्षक सेवकांना विशिष्ठ कालावधीनंतर Career Advancement Scheme अंतर्गत Academic Grade Pay बदलाची सहाव्या वेतन आयोगामध्ये तरतुद आहे. सन २००६ नंतर सदरची प्रक्रिया महाविद्यालयामध्ये राबविण्यात आलेली नाही. त्यामुळे खालील सेवकांनी CAS अंतर्गत AGP बदलासाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केले आहेत.

अ. क्र.	सेवकांचे नाव	पद	विभाग	सध्याचा AGP
१	प्रा. उचले भागवत शंकर	सहा. प्राध्यापक	कॉम्पुटर	६०००
२	डॉ. निपाणीकर सुरेश रामचंद्र	सहा. प्राध्यापक	मेकॅनिकल	७०००
३	प्रा. पाटील शरदचद्र श्रीकांत	सहा. प्राध्यापक	मेकॅनिकल	६०००
४	डॉ. जाधव प्रविण लक्ष्मण	सहा. प्राध्यापक	मेकॅनिकल	७०००
५	प्रा.माळवदे निकेत विष्णू	सहा. प्राध्यापक	मेकॅनिकल	६०००
६	प्रा.शेख अमीर मुस्ताफा	सहा. प्राध्यापक	मेकॅनिकल	६०००
७	प्रा.सौ. शिंदे मिनाक्षी युवराज	सहा. प्राध्यापक	मेकॅनिकल	७०००
८	प्रा. महादार अमोल अरुण	सहा. प्राध्यापक	सिव्हील	७०००
९	प्रा.घाटगे दयानंद आनंदा	सहा. प्राध्यापक	मेकॅनिकल	६०००

याबाबत विद्यापीठाकडुन कमिटी घेवुन त्यानुसार योग्य ती पुढील कार्यवाही करणेस सभेने परवानगी दिली.

सूचक -: डॉ. ए. सी. अत्तार
अनुमोदक -: मा. डॉ. एन. बी. पासलकर
ठराव सर्वानुमते मंजूर.....

विषय क्र.१६. :- श्री. डी. बी. देवी यांनी पाठवलेल्या विविध ईमेल बाबत माहिती देणे.

ठराव क्र. १६ :- या महाविद्यालयातील इलेक्ट्रीकल इंजिनिअरींगचे प्राध्यापक श्री. धनंजय भगवानदास देवी यांना या महाविद्यालयामध्ये पुरेसा कार्यभार शिल्लक नसलेने या सभेच्या दि. २२/०७/२०२१ रोजीच्या सभेमध्ये ठरलेनुसार संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील तंत्रनिकेतन, सातारा या महाविद्यालयामध्ये दि. ३०/१०/२०२१ पासुन बदली करण्यात आली होती.

बदलीनंतर श्री. देवी यांनी महाविद्यालयास, संस्थेस व रयत शिक्षण संस्थेच्या सर्व सन्माननीय मॅनेजिंग कौन्सिल सदस्य यांना नाहक ईमेल पाठवुन महाविद्यालयाची चुकीची माहिती देवुन बदनामी सुरू केली आहे. तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची धमकी देणे, माहिती अधिकार अंतर्गत माहिती मागवणे, महाविद्यालयामधील सेवकांचेमध्ये अफवा पसरवणे, सामुहिक पध्दतीने मागण्या मागणेसाठी सेवकांना प्रोत्याहित करणे. इ. महाविद्यालयास प्रतिकुल कामकाज करत आहेत. श्री. देवी यांनी पाठवलेल्या ईमेल बाबातचा संक्षिप्त अहवाल आपले माहितीसाठी सोबत जोडला आहे.

श्री. डी. बी. देवी यांनी पाठवलेल्या विविध ईमेल याचे सभेने अवलोकन केले तसेच महाविद्यालयाची व प्रशासनाची बदनामी करणारे कामकाज न करणेबाबत श्री. डी. बी. देवी यांना संस्थास्तरावरून समज देण्यात येईल असे ठरले.

सूचक -: मा. दिलीप वळसे पाटील
अनुमोदक -: डॉ. एन. बी. पासलकर
ठराव सर्वानुमते मंजूर.....

विषय क्र.१७. :- निलंबित सेवक श्री. मनोहर कदम यांनी दिलेल्या अर्जावर चर्चा करणे.

ठराव क्र. १७ :- या महाविद्यालयातील श्री. मनोहर विश्वनाथ कदम (भांडारपाल) यांना दिनांक २९.११.२०१९ पासून निलंबीत करण्यात आले आहे. मा. सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा. यांच्याकडील पत्रानुसार महाविद्यालयाचे भाडांरपाल श्री. मनोहर विश्वनाथ कदम यांचे हातून घडलेल्या अनियमित गैरबाबी व गैरवर्तणुकीची खातेनिहाय चौकशी करण्याचा निर्णय संस्थेने घेतलेला आहे. त्यानुसार या चौकशी समितीचे कामकाजासाठी संस्थेने समिती गठीत करण्यात आली आहे. आज अखेर चौकशी समितीच्या ०४ सभा झालेल्या आहेत. अद्याप गठीत केलेल्या समितीने श्री. मनोहर विश्वनाथ कदम यांच्याबाबतचा निर्णय दिलेला नाही.

श्री. मनोहर विश्वनाथ कदम यांनी दिनांक १८.०३.२०२२ रोजी मा. सचिवसाहेब, रयत शिक्षण संस्था, सातारा व मा. प्राचार्य, कर्मवीर भाऊराव पाटील अभिंयात्रिकी महाविद्यालय, सातारा यांना निवार्हभत्ता / निलंबनभत्ता रक्कम १०० % मिळणेबाबत व मागील फरकासह भत्ता प्राप्त व्हावा असा अर्ज या सादर केलेला आहे. सदर अर्जाबाबत महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सभेला माहिती दिली.

याबाबत प्रि. डॉ. विठ्ठल शिवणकर सचिव, रयत शिक्षण संस्थचे यांनी संस्थेच्या कायदा विभागाकडे श्री. कदम मनोहर यांच्याबाबतचा विषय सांगून तो पूर्ण करणेबाबत सभेस आश्वासित केले.

सूचक -: प्रि. डॉ. विठ्ठल शिवणकर
अनुमोदक -: मा. डॉ. अनिल पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर.....

विषय क्र.१८. :- महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबींविषयी मंजुरी घेणे.

विषय क्र.१८.०१:-शै. वर्ष २०२०-२१ च्या कर्मवीर स्कॉलरशिपच्या खर्चास सभेची मंजूरी घेणे

ठराव क्र. १८.०१ :- या महाविद्यालयातील इलेक्ट्रानिक्स या अभ्यासक्रमाला प्रवेश कमी होत असल्याने शैक्षणिक वर्ष २०१७ पासुन कर्मवीर स्कॉलरशीप या शिर्षकाखाली फि सवलत दिली जाते. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासुन सदरची कर्मवीर स्कॉलरशीप पुर्णपणे बंद करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०१७ साली प्रवेशीत विद्यार्थ्यी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साली उत्तीर्ण झाले आहेत. त्यानुसार सन २०२०-२१ या वर्षामध्ये रक्कम रू. १५.८१ लक्ष इतकी फी सवलत देण्यात आली आहे. तरी सदरचा व्यवहार ऑडीट रिपोर्टमध्ये पुर्ण करणेसाठी या खर्चास सभेने परवानगी दिली.

विषय क्र.१८.०२ :- प्रवेश समितीच्या शिफारशीनुसार विद्यार्थ्यांना फि सवलत देणेबाबात चर्चा करून निर्णय घेणे.

ठराव क्र. १८.०२ :- या महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासुन प्रथम वर्षामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार कर्मवीर स्कॉलरशीप दिली जाते. त्यानुसार खालील विद्यार्थ्यांनी त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने कर्मवीर स्कॉलरशिप मिळणेसंदर्भात महाविद्यालयाकडे अर्ज केला आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. ए. सी. अत्तार यांनी सभेस दिली.

१. कु. घारे ऋषिकेश विजय - इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिगरींग - १५,०००/-
२. कु. निकम प्रतिक्षा प्रकाश - सिव्हिल इंजिनिगरींग - २०,०००/-
३. कु. राजशिर्के संकेत महेंद्र - सिव्हिल इंजिनिगरींग - १५,०००/-
४. कु. कदम तेजस - मेकॅनिकल इंजिनिगरींग - १५,०००/-

उपरोक्त प्रमाणे एकुण ०४ विद्यार्थ्यांना सभेने कर्मवीर स्कॉलरशीप मंजुर करणेसाठी सभेने मंजुरी दिली.

विषय क्र.१८.०३ :- सन २०११ पासुनचा Income Tax व GST दंड भरणेस सभेची मंजूरी घेणे.

ठराव क्र. १८.०३ :- या महाविद्यालयातील पगार उशिरा होत असल्याने सन २०१९-२० ते २०२०-२१ पासुनचा Income Tax बाबातचा दंड रक्कम रू ९९,८७० व सन २०१८-१९ मध्ये GST चा ६१,९६४ इतकी रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरणेबाबत संस्थेने कळविले होते. त्यानुसार सदरचा दंड ऑनलाईन पध्दतीने भरला आहे. तरी त्यास कार्योत्तर परवानगी देणेत आली.

विषय क्र.१८.०४ :- सन २०२०-२०२१ मधील अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जादा खर्चास सभेची मंजूरी घेणे.

ठराव क्र. १८.०४ :- या महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवक सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचे जागेवर रोजंदारी तत्वावर सेवक नेमुन महाविद्यालयाचे कामकाज केले जाते. सदर सेवकांना देण्यात येणारे मानधन संस्था मार्गदर्शनानुसार देखभाल खर्च म्हणुन रेकॉर्ड केले जाते. त्यानुसार सिव्हील इंजिनिअरींग या विभागाच्या दोन प्रयोगशाळा सहाय्यक यांना सन २०२०-२१ मध्ये रक्कम रू. १,९१,५८० इतके मानधन अदा करण्यात आले आहे. तथापी अंदाजपत्रकामध्ये रक्कम रू. ५०,००० इतकी तरतुद आहे. त्यानुसार रक्कम रू १,४१,५८० इकक्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास परवानगी देण्यात आली.

विषय क्र.१८.०५ :- सॉफ्टवेअर डेव्हलमेंट सेलच्या सन २०२१-२०२२ च्या जमा-खर्चास सभेची मंजुरी घेणे.

ठराव क्र. १८.०५ :- या महाविद्यालयाने सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेलची स्थापना करून यामार्फत College /School ERP Software, Online Examination Software, E-Recruitment Software इ. सॉफ्टवेअरर्सची निर्मिती केली आहे. उपरोक्तप्रमाणे सॉफ्टवेअरर्स संस्थेच्या २३ महाविद्यालयांना व शिवाजी विद्यापीठीतील ११८

महाविद्यालयांना उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यानुसार सॉफ्टवेअर डेव्हलमेंट सेलच्या सन २०२१-२०२२ च्या जमा-खर्चाची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. सी. अत्तार यांनी सभेस सादर केली. सदर खर्चास सभेने मजुरी दिली.

SOFTWARE DEVELOPMENT CELL

RECEIPT AND PAYMENT STATEMENT - 01.04.2021 TO 28.03.2022

RECEIPTS	AMOUNT (IN LAKHS)	AMOUNT (IN LAKHS)	PAYMENTS	AMOUNT (IN LAKHS)	AMOUNT (IN LAKHS)
DIRECT RECEIPTS			**DIRECT EXPENSES**		
ONLINE EXAMINATION CHARGES	21.85		SALARY TO STAFF	9.91	
COLLEGE ERP CHARGES	48.90		SERVER/DOMAIN CHARGES	6.33	
WEBSITE HOSTING & DEVELOPMENT	0.25		REMUNERATION	3.25	
ONLINE RECRUITMENT (ZP)	3.06	**74.06**	MAINTENANCE CHARGES	0.19	
			SMS CHARGES	0.40	
RECEIVABLES (ONGOING PROJECTS)			MOBILE CHARGES	0.22	
DIGITAL RECORD ROOM CHARGES	9.00		OTHER EXPENSES	0.12	**20.42**
RAYAT SCHOOL ERP	26.00				
RAYAT TRANSFER PORTAL	4.00				
RAYAT PROPERTY PORTAL	2.00	**41.00**			
TOTAL RECURRING RECEIPTS		**115.06**	**TOTAL RECURRING PAYMENTS**		**20.42**
			SURPLUS DURING THE YEAR		**94.64**
GRAND TOTAL		**115.06**	**GRAND TOTAL**		**115.06**

विषय क्र.१८.०६ :- विद्यार्थ्यांना प्रोजेक्टसाठी द्यावयाच्या खर्चास सभेची मंजुरी घेणे.

ठराव क्र. १८.०६ :- महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी समाजभिमुख व नवनवीन तंत्रज्ञानावर अधारीत प्रोजेक्स करावे यासाठी महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांच्या प्रोजेक्टसाठी खालीलप्रमाणे विभागनिहाय खर्च सभेसमोर मा. प्राचार्य यांनी सादर केला. त्यास सभेने मंजुरी दिली.

अ.क्र.	अभ्यासक्रमाचे नाव	प्राजेक्टसाठी द्यावयाची रक्कम
१	कॉम्पुटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग	०२ लक्ष
२	इलेक्ट्रानिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग	०१ लक्ष
३	मेकॅनिकल इंजिनिअरींग	०५ लक्ष

४	सिव्हील इंजिनिअरींग	०२ लक्ष
	एकुण	**१० लक्ष**

संबंधित विभागांनी सादर केलेले प्रस्ताव सभेच्या अवलोकनार्थ सोबत जोडले आहेत.

विषय क्र.१८.०७ :- महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा केंद्र स्थापन करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास सभेची मंजुरी घेणे.

ठराव क्र. १८.०७ :- या महाविद्यालयामध्ये अद्यावत असे सर्व सुविधायुक्त स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करणेसाठी विद्यार्थ्यी व पालकांची मागणी आहे. तसेच अशा प्रकारची सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी तंत्रशिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनीही अधिसुचित केले आहे. रयत शिक्षण संस्थेने शासनाकडुन मिळालेल्या शताब्दी निधीमधुन पाच विभागामध्ये अशाप्रकारची सर्व सोईयुक्त अद्यावत स्पर्धा केंद्र सुरू केली आहेत. यानुसार आपले महाविद्यालयामध्ये स्पर्धा परिक्षा केंद्र तयार करणेसाठी रक्कम रू १६ लक्ष इतका खर्च येणार आहे. तरी सदरच्या स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करणेसाठी व यासाठी आवश्यक असणारे साहित्य रयत शताब्दी निधीच्या मध्यवर्ती खरेदी समितीने निविदाव्दारे निश्चित केलेल्या प्रक्रियेमधुन खरेदी करणेसाठी, सभेने परवानगी दिली.

विषय क्र.१८.०८:- महाविद्यालयातील बेंच खरेदीसाठीच्या वाढीव खर्चास सभेची मंजुरी घेणे.

ठराव क्र. १८.०८ :- या महाविद्यालयामधील वर्गखोल्यामधील बेंच हे कालबाहय झाले व मोडखळीस आले आहेत. सदरचे बेंच सन १९९० पासुनचे आहेत व ते बदलने गरजेचे आहे. त्यानुसार सदरचा विषय नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) च्या दिनांक २२ ऑक्टोबर २०२१ रोजीच्या सभेसमोर विचारर्थ मांडला होता. त्यानुसार सभेने सदरचे बेंच बदलणेसाठी येणाऱ्या रक्कम रू १५ लक्ष इतक्या खर्चास मंजुरी दिली होती. तथापी महाविद्यालयामध्ये कॉम्पुटर सायन्स ॲन्ड

इंजिनिअरींग या अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता ६० वरून १२० झालेने बेंचची संख्या वाढली आहे. त्यानुसार बेंच खरेदीसाठी एकुण २५ लक्ष इतका खर्च होणार आहे. त्यानुसार वाढीव १० लक्ष इतक्या रक्कमेच्या खर्चास सभेने मंजुरी दिली.

विषय क्र.१८.०९:- महाविद्यालयाच्या वसतीगृह दुरूस्ती बाबत चर्चा करणे व खर्चास सभेची मंजुरी घेणे.

ठराव क्र. १८.०९ :- या महाविद्यालयालयाचे मुलांचे व मुलींचे वसतीगृह मागील दोन वर्षापासुन कोरोना मुळे बंद आहे. बऱ्याच वर्षापासुन या वसतीगृहाच्या दुरूस्तीचे कामकाज झालेले नाही. प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष प्रवेश प्रक्रिया पुर्ण झालेने पालकांचेकडुन विद्यार्थ्यीनी वसतीगृहाची वारंवार मागणी येत आहे. सध्या या वसतीगृहातील रंगकाम, लाईट, फॅन, स्वच्छतागृह इ. ची जुजबी दुरूस्ती करणे गरजेचे आहे. NBA ची कमिटी लवकरच महाविद्यालयास भेट देणार आहे. यासाठी वसतीगृह सुविधा असणे गरजेचे आहे. यासंदर्भात वसतीगृह समितीने केलल्या शिफारशीनुसार मुलांच्या वसतीगृहासाठी अंदाजे ४.५० लक्ष व मुलींच्या वसतीगृहासाठी ६० हजार रूपये असे एकुण ५.१० लक्ष खर्च येईल. त्यानुसार सदरच्या वसतीगृह दुरूस्ती खर्चास सभेने मंजुरी दिली.

विषय क्र.१८.१०:- महाविद्यालयाच्या वसतीगृहामधील विद्यार्थ्यांची कोरोना काळातील वसतीगृह फी परत देणेबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

ठराव क्र. १८.१० :- या महाविद्यालयालयाचे मुलांचे व मुलींचे वसतीगृह मागील दोन वर्षापासुन कोरोना मुळे बंद आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षामध्ये वसतीगृहमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी वसतीगृह बंद असल्याले भरेलेली फि परत मिळणेबाबत या कार्यालयास विनंती केली आहे. विद्यार्थ्यांच्या

विनंतीनुसार, विद्यार्थी जेवढे दिवस वसतीगृहामध्ये राहत होते, तेवढे दिवसांची फि वजा करून (१५०००/१२x राहत असलेले महिने) याप्रमाणे उर्वरीत फि परत देणेविषयी सभेने मंजुरी दिली.

विषय क्र.१८.११:- महाविद्यालयाच्या झेरॉक्स सेंटरचे कोरोना काळातील भाडे माफ करणेबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

ठराव क्र. १८.११ :- या महाविद्यालयालयाचे झेरॉक्स सेंटर भाडे तत्वावर दिले जाते. कारोनामुळे महाविद्यालय बंद असल्याने संबंधित निविदधारक यांनी माहे फेब्रवारी २०२१ ते डिसेंबर २०२१ या काळातील भाडे माफ होणेविषयी सभेस विनंती केली. त्यानुसार सदरचे कालावधीचे भाडे माफ करणेस सभेने मंजुरी दिली.

विषय क्र.१८.१२:- महाविद्यालयास विहीत पध्दतीने नवीन ठेकेदार नियुक्ती होईपर्यत सुरक्षा रक्षक पुरवठा करणाऱ्या सध्याच्या पुरवठाधारकास आहे त्याच दराने सदरची सेवा सुरू ठेवण्यास व त्यास येणाऱ्या खर्चास सभेची मंजूरी घेणे.

ठराव क्र. १८.१२ :- या महाविद्यालयामध्ये तसेच दोन्ही वसतिगृहामध्ये मे. फेन्स वॅरिअर्स, सातारा यांचेकडील एकूण १२ सुरक्षा रक्षक ११ महिन्याच्या लिव्ह अँड लायसन्स तत्वावर कार्यरत आहेत. उपरोक्त ठेकेदार यांचा करारनामा हा दिनांक ०१ जानेवारी २०२१ ते ३० नोव्हेंबर २०२१ अखेर या कालावधीचा आहे. प्रशासनाने नवीन ठेकेदार नियुक्तीसाठी दैनिक सकाळ या वृत्तपत्रामध्ये दि. १४ फेब्रवारी २०२२ रोजी जाहिरात दिलेली होती. जाहिरातीस अनुसरुन एकूण सहा निविदा आलेल्या आहेत. त्यानुसार दिनांक ०६ मार्च २०२२ रोजीच्या खरेदी कमिटीच्या निर्णयानुसार निविदा मंजुर होवुन दिनांक ०१ एप्रिल २०२२ पासुन पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

सबब, करार संपल्यापासून म्हणजे माहे डिसेंबर २०२१ ते मार्च २०२२ असे एकूण चार महिन्याचे देयक रु. ३,८५,०००/- इतक्या खर्चास सभेने मंजूरी दिली.

विषय क्र.१८.१३:- महाविद्यालयास विहीत पध्दतीने नवीन ठेकेदार नियुक्ती होईपर्यत इंटरनेट पुरवठा करणाऱ्या सध्याच्या पुरवठाधारकास आहे त्याच दराने सदरची सेवा सुरू ठेवण्यास व त्यास येणाऱ्या खर्चास सभेची मंजूरी घेणे.

ठराव क्र. १८.१३ :- या महाविद्यालयामध्ये सध्या मे. आयनेट सातारा यांचेकडून ५० mbps १:१ Leased Line Internet Connection सेवा दि.०१.०३.२०२१ ते २८.०२.२०२२ या कालावधीकरिता घेणेत आलेली आहे. प्रशासनाने नवीन ठेकेदार नियुक्तीसाठी दैनिक सकाळ या वृत्तपत्रामध्ये दि. १४ फेब्रवारी २०२२ रोजी जाहिरात दिलेली होती. जाहिरातीस अनुसरुन एकूण सहा निविदा आलेल्या आहेत. त्यानुसार दिनांक ०६ मार्च २०२२ रोजीच्या खरेदी कमिटीच्या निर्णयानुसार निविदा मंजुर होवुन दिनांक ०१ एप्रिल २०२२ पासुन पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

सबब, करार संपल्यापासून म्हणजे माहे मार्च २०२२ ते मार्च २०२२ असे एक महिन्याचे देयक रु.१७,०००/- इतक्या खर्चास सभेने मंजूरी दिली

विषय क्र.१८.१४:- महाविद्यालयामध्ये NBA साठी विविध प्रकारचे बोर्ड / फ्लेक्स लावणेसाठीच्या खर्चास सभेची मंजुरी घेणे.

ठराव क्र. १८.१४ :- या महाविद्यालयास NBA कमिटी माहे एप्रिल महिन्यामध्ये भेट देणार आहे. त्याअनुषंगाने महाविद्यालयामध्ये विविध वैधानिक समित्या, ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट संदर्भातील माहिती, वर्गखोल्या, प्रयोगशाळा, वर्कशॉप, सभागृह, ग्रंथालय, कार्यालय, जिमखाना याठिकाणी विविध प्रकारच्या सुचना इ. बोर्ड

लावणे गरजेचे होते. यासाठी अंदाजे ६०,००० इतका खर्च येणार आहे. त्यास मंजुरी दिली.

विषय क्र.१८.१५ :- महाविद्यालयातील परीक्षा विभागासाठी, आय.टी. सेल व कार्यालयासाठी तसेच सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेल यासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याच्या खरेदीस व खर्चास सभेची मंजुरी घेणे.

ठराव क्र. १८.१५ :- या महाविद्यालयातील परीक्षा विभागासाठी, आय.टी. सेल व कार्यालयासाठी तसेच सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेल यासाठी खालीलप्रमाणे साहित्याची आवश्यकता आहे. सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेल मार्फत विविधप्रकारच्या सेवा पुरवल्या जातात व यामधुन महाविद्यालयास उत्पन्न प्राप्त होते. यासाठी खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करणे गरजेचे आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सभेस दिली.

अ.क्र.	कामाचा तपशिल	संख्या	अंदाजे खर्च
०१	झेरॉक्स मशीन	०१	१,३७,०००/-
०२	डुप्लेक्स कलर प्रिंटर	०१	५४,०००/-
०३	५५ इंची स्मार्ट टि.व्ही	०३	१,४१,०००/-
०४	ऑडीओ मिक्सर	०१	१७,०००/-
०५	स्किल डेव्हलपमेंट किट	०१	६३,०००/-
०६	नेटवर्क फायरवॉल	०१	५०,०००/-
०७	साऊंड सिस्टम	०१	२५,०००/-

उपरोक्त प्रमाणे साहित्य रयत शिक्षण संस्थेच्या मध्यवर्ती खरेदी समितीने निविदाव्दारे निश्चित केलेल्या प्रक्रियेमधुन नियुक्त केलल्या निविदाधारकाकडुन खरेदी करणेस मा. चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) यांची पुर्वपरवानगी घेण्यात आली आहे, त्यानुसार सभेने परवानगी दिली.

उपरोक्त प्रमाणे विषय क्र. १८.०१ ते १८.१५ च्या खरेदीस/खर्चास सभेने मंजुरी दिली.

सूचक -: प्रा. डॉ. माने एस. व्ही.
अनुमोदक -: मा. डॉ. पासलकर एन. बी.
ठराव सर्वानुमते मंजूर.....

विषय क्र.१९ :- मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

सन्मानीय चेअरमन व सदस्य नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे कडून ऐनवेळी खालील प्रमाणे विषय सभेमध्ये प्राप्त झालेले आहेत.

विषय क्र. १९.०१ :- फायर सेफ्टीसाठी लिफ्ट बसवणे व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी घेणेबाबत.

ठराव क्र :- १९.०१ :- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांचे निर्देशांनुसार दरवर्षी मान्यता प्रक्रिया करावी लागते. त्यानुसार महाविद्यालयामध्ये फायर सेफ्टीची सुविधा असणे आवश्यक आहे. फायर सेफ्टीसाठी महाविद्यालयामध्ये लिफ्ट बसवणे नियमानुसार गरजेचे आहे. तसेच प्राणी साठविणेसाठी ५०,००० लिटर क्षमतेची पाण्याची टाकी बांधणे आवश्यक आहे.

त्याअनुसरून महाविद्यालयातील कर्मवीर आण्णाच्या फोटो शेजारी असलेल्या रिकाम्या जागेमध्ये लिफ्ट बसवणे व वर्कशॉपच्या शेजारी पाण्याची टाकी बांधणे यासाठी येणाऱ्या खर्चाबाबत

महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. उपरोक्त प्रमाणे कर्मवीर आण्णांच्या फोटो शेजारी असलेल्या रिकाम्या जागेमध्ये लिफ्ट बसवणेस व पाण्याची टाकी बांधणेसाठी येणाऱ्या अंदाचे २० लाख रु. खर्चास सभेने मंजुरी दिली.

सूचक -: प्रिं. डॉ. ए. सी. अत्तार
अनुमोदक -: मा. दिलीप वळसे पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर.....

विषय क्र. १९.०२ :- महविद्यालयात कॅपजेमिनी सेंटर सुरु करणे व त्यासाठी लागणाऱ्या प्रयोगशाळा अद्यावत करणेबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

ठराव क्र :- १९.०२ :- मा. खा. शरदचंद्र पवार साहेब अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था सातारा यांच्या सूचनेनुसार महाविद्यालयाने कॅपजेमिनी या Software कंपनीबरोबर सामज्यस्य करार करणेचे ठरविले आहे. या करारामध्ये कॅपजेमिनी कंपनीतर्फे महाविद्यालयामध्ये डीजीटल ॲकॅडमि उभारण्यात येणार आहे. त्यासाठी काही प्रयोगशाळा अद्यावत करणे गरजेचे आहे. त्यामध्ये फरशी बदलणे, अल्युमिनियम खिडक्या बसवणे, इलेक्ट्रिकल फिटिंग करणे व रंगरंगोटी करणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. त्यासाठी येणाऱ्या अंदाचे १२ लाख रु. खर्चास सभेने मंजुरी दिली.

सूचक -: प्रिं. डॉ. ए. सी. अत्तार
अनुमोदक -: मा. डॉ. अनिल पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर.....

विषय क्र. १९.०३ :- महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी हंगामी नियुक्ती करण्यात येणाऱ्या (ADHOC) शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांना पी.एफ. लागू करणेबाबत.

ठराव क्र. १९.०३ :- महाविद्यालयात शिक्षक सेवकांची संख्या नियमानुसार कमी असल्याने महाविद्यालयात हंगामी (ADHOC) शिक्षकांची नेमणूक करणेत येते, त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नियुक्त करणेत येणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांना पी. एफ. चालु करावेत याबाबत मा. दिलीप वळसे पाटील यांनी सुचना केली. त्यानुसार मा. प्राचार्य यांनी महाविद्यालयात नियुक्ती करणेत येणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांना पी. एफ. चालू करणेबाबत सभेस माहिती दिली व त्यास सभेने मंजुरी दिली.

सूचक -: मा. दिलीप वळसे पाटील
अनुमोदक -: मा. डॉ. अनिल पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर.....

विषय क्र. १९.०४ :- महाविद्यालयात इमारत अद्यावत करणेबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

ठराव क्र :- १९.०३ :- या महाविद्यालयाचे बांधकाम सन १९९९ मध्ये पूर्ण झालेले आहे. त्यामुळे सर्व वर्गखोल्या व प्रयोगशाळा या जुन्या झाल्या असून त्याची देखभाल व दुरुस्ती करणे जिकीरीचे झालेले आहे. याबाबत ची माहिती मा. प्राचार्य यांनी सभेस दिली.

महाविद्यालयाचे नियामक मंडळाचे अध्यक्ष मा. दिलीप वळसे पाटील साहेब यांनी महाविद्यालयाचे आधुनिकीकरण करणेसंदर्भात आर्केटेक कडून प्लॅन व एस्टिमेट तयार करून घेणेबाबत सूचना केली. व त्यानुसार टप्याटप्याने इमारतीचे आधुनिककरण करण्यात यावे, असे ठरले. व त्यास सभेने मंजुरी दिली.

शेवटी सभेचे सचिव तथा महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. ए. सी. अत्तार यांनी उपस्थित असेलेले सर्व सदस्यांचे आभार मानले, व सभेचे कामकाज समाप्त झाली.

प्राचार्य तथा सचिव
नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, सातारा

प्राचार्य तथा सचिव
नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,सातारा.

चेअरमन
नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,सातारा.